RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक - अ — नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ६ ] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ३ - ९, २०२६ / भाद्रपद १२ - १८, शके १९४८ [ पृष्ठे ०४

## प्राधिकृत प्रकाशन

### जिल्हाधिकारी यांजकडून

*महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२*

**अधिसूचना**

क्रमांक रानप/करनिर्धारण/२१/सन २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिनांक ३ डिसेंबर २०१२ रोजी महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ प्रख्यापित केला होता;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा. २७) च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा ३) या अन्वये गठित केलेल्या **राहाता नगरपरिषद** क्षेत्राच्या बाबतीत दिनांक १ एप्रिल २०२६ पासून जमिनींचे किंवा इमारतींचे भांडवलीमूल्य मालमत्ता कराच्या आकारणीच्या मूलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव, नगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, दर राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आता त्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* व कलम ६-ब च्या खंड *(अ)* मधील उपखंड *(दोन)* अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना राहाता नगरपरिषदेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यक्षेत्रामधील राहाता नगरपरिषदेच्या क्षेत्रासाठी, निवासी व निवासेतर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्या दराने राहाता नगरपरिषदेने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत ते दर याद्वारे सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल २०२६ पासून अधिसूचित करीत आहे.

**अनुसूची**

| अ.क्र. | कराचा प्रकार | कराचा दर (टक्के) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | बिगर निवासी | औद्योगिक | खुला भूखंड |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | टक्के | टक्के | टक्के | टक्के |
| १ | शिक्षण उपकर (भांडवली मूल्याच्या). | ०.०१ | ०.०१ | ०.०१ | ०.०१ |
| २ | रोजगार हमी उपकर (भांडवली मूल्याच्या). | लागू नाही | ०.००५ | ०.००५ | लागू नाही |

**डॉ. पंकज आशिया** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.

अहिल्यानगर, २४ ऑगस्ट २०२६.

---

## BY COLLECTOR

*Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962*

## Notification

No. रानप/करनिर्धारण/२१/सन २०२६.– Whereas, the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012;

and whereas, sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause *(a)* of Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 (Mah. XXVII of 1962) as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012, empowers the Collector to notify the rates of a tax on lands and buildings used or intended to be used for a residential and non-residential purpose, to be levied with effect from 1st April 2026 in the municipal area of **Rahata Municipal Council** constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 by Notification in Maharashtra Government Gazette on receipt of the proposal from Rahata Municipal Council for that purpose.

Now therefore, in exercise of the powers conferred by sub-clause *(ii)* of Clause (a) of Section 4 and sub-clause *(ii)* of Clause (a) Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) (Amendment) Act, 2012 the Collector, Ahilyanagar District upon receipt of proposal from Rahata Municipal Council hereby, notifies the rates of a tax on lands and buildings used or intended to be used for a residential and non-residential purpose, at which the State Education Cess and Employment Guarantee Cess on capital value of lands and buildings, shall be levied and collected by the Rahata Municipal Council as mentioned in the schedule appended hereto, in the municipal area within the jurisdiction of Collector, Ahilyanagar with effect from the 1st April 2026.

**Schedule**

| Sr.No. | Type of Tax | Tax Rate (per cent) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Residential | Non-Residential | Industrial | Open Space |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | per cent | per cent | per cent | per cent |
| 1 | Education Cess (on Capital Value). | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 |
| 2 | Employment Guarantee Cess (on Capital Value). | NA | 0.005 | 0.005 | NA |

**DR. PANKAJ ASHIYA** (I.A.S.),
Collector, Ahilyanagar.

Ahilyanagar, 24th August 2026.

---

**अधिसूचना**

क्रमांक नपप्र/कार्या-२/कावी-२६०/जा.क्र.६३३/सन २०२६.— ज्याअर्थी, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ व नियम १९८७ मधील तरतुदींनुसार, कर्जत नगरपंचायतीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी गटाचे गटनेते श्री. सतिष उद्धवराव पाटील यांनी कर्जत नगरपंचायतीमधील ६ नगरसेवकांविरुद्ध अपात्रता अर्ज दाखल केला होता. कर्जत नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष श्री. संतोष सोपान मेहत्रे यांच्याविरुद्ध अविश्वास ठरावाकरिता दिनांक १५ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विशेष सभेसाठी बजावण्यात आलेल्या अधिकृत व्हीपचे (Whip) उल्लंघन करून संबंधित नगरसेवक सदर विशेष सभेस गैरहजर राहिले होते. सदर प्रकरणाची कायदेशीर सुनावणी घेऊन, उभय पक्षांचे युक्तिवाद, सादर केलेली कागदपत्रे व उपलब्ध अभिलेख यांचे अवलोकन केल्यानंतर, मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ च्या कलम ३ *(१) (ब)* मधील तरतुदींनुसार खालील नमूद नगरसेवकांना आदेशाच्या दिनांक १८ ऑगस्ट २०२६ पासून पुढील सहा (६) वर्षांच्या कालावधीसाठी नगरसेवक किंवा स्थानिक प्राधिकरणाचे सदस्य म्हणून राहण्यास अपात्र घोषित केले आहे. त्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रिक्त झाले आहे. त्याअर्थी, संबंधित नगरसेवकांची नावे व अपात्रतेचा तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | निवडून आलेल्या नगरपंचायत सदस्याचे नाव | प्रभाग क्रमांक | जागा राखीव असेल तर कोणत्या प्रवर्गासाठी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | सौ. रोहिनी सचिन घुले | ५ | सर्वसाधारण (स्त्री) |
| २. | सौ. मोनाली ओंकार तोटे | ६ | सर्वसाधारण |
| ३. | श्री. भाऊसाहेब सुधाकर तोरडमल | ८ | सर्वसाधारण |
| ४. | श्री. भास्कर बाबासाहेब भैलुमे | १५ | अनुसूचित जाती |
| ५. | श्री. संतोष सोपान मेहत्रे | ३ | सर्वसाधारण |
| ६. | श्रीमती ताराबाई सुरेश कुलथे | १४ | सर्वसाधारण (स्त्री) |

ही अधिसूचना सर्व संबंधितांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डॉ. पंकज आशिया** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, अहिल्यानगर.

अहिल्यानगर, २५ ऑगस्ट २०२६.

---

## Notification

No. Napapr/Desk-2/WS-260/O.No. 633/2026.– Whereas, In accordance with the provisions the Maharashtra Local Authority Members' Disqualification Act, 1986 and Rule 1987, Shri. Satish Uddhavrao Patil, Group Leader of the Nationalist Congress Party (NCP) Group of Karjat Nagarpanchayat had filed a disqualification application against six elected councillors of Karjat Nagarpanchayat. A special meeting was convened on 15th July 2026 for consideration of the no-confidence motion against the Vice-President of Karjat Nagarpanchayat, Shri. Santosh Sopan Mehetre. The concerned councillors remained absent from the said special meeting in violation of the Whip issued by the authorized Whip. After conducting the legal hearing in the said matter and upon examining the arguments presented by both parties, the documents submitted and the available records, the District Collector, Ahilyanagar, in accordance with the provisions of Section 3 *(1)(b)* of the Maharashtra Local Authority Members' Disqualification Act, 1986 has declared the following councillors disqualified from continuing as councillors or members of a local authority for a period of six (6) years from 18th August 2026. Accordingly, As a result, post as a councillors has become vacant. The names of the concerned councillors and details regarding their disqualification are as follows:

### Annexure

| Sr. No. | Name of Elected Nagarpanchayat Member | Ward No. | If the Seat is Reserved, Category |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | Smt. Rohini Sachin Ghule | 5 | General (Women) |
| 2. | Smt. Monali Omkar Tote | 6 | General |
| 3. | Shri. Bhausaheb Sudhakar Toradmal | 8 | General |
| 4. | Shri. Bhaskar Babasaheb Bhelume | 15 | Scheduled Castes |
| 5. | Shri. Santosh Sopan Mehetre | 3 | General |
| 6. | Smt. Tarabai Suresh Kulthe | 14 | General (Women) |

This notification is being published for the information of all concerned.

**Dr. PANKAJ ASHIYA** (I.A.S.),
Collector, Ahilyanagar.

Ahilyanagar, 25th August 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.